सातारा, शुक्रवार, २४ मार्च २०१७ । किंमत ₹ ४

# सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# स्वच्छ प्रशासनात युवकांचा सहभाग महत्त्वाचा

## पोलिस उपअधीक्षक प्रेरणा कट्टे; कोरेगाव पोलिस उपविभागाच्या स्तरावरील वक्तृत्व स्पर्धा

**कोरेगाव, ता. २३ :** स्वच्छ प्रशासनात युवकांचा सहभाग महत्त्वाचा असून, देशाला महासत्ता बनविण्यासाठी योगदान देणारा युवकवर्ग निर्माण करण्याच्या उद्देशाने शाळा, महाविद्यालयांत पोलिस विभागातर्फे वक्तृत्व स्पर्धांचा उपक्रम आयोजित केला आहे. आतंकवाद, नक्षलवाद, भ्रष्टाचाराचा बीमोड करण्यासाठी मोठ्या संख्येने युवक पुढे आल्यास हा उपक्रम सार्थकी ठरेल, असे प्रतिपादन पोलिस उपअधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले.

कोरेगाव पोलिस उपविभागाच्या स्तरावरील डायरेक्टर जनरल युथ पार्लमेंट चँपियनशीप वक्तृत्व स्पर्धा येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात झाली. त्या वेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी सभापती राजाभाऊ जगदाळे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी पोलिस निरीक्षक संतोष पांढरे व त्यांचे सहकारी कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धेत उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील चार पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील शाळा, महाविद्यालयांतील विजयी संघांनी सहभाग घेतला. त्यामध्ये श्री मुधाईदेवी विद्यामंदिर (देऊर), सौ. वत्सला भोईटे विद्यालय (तडवळे), गणपतराव काळंगे गुरुजी विद्यालय (मोळ, मांजरवाडी), सरस्वती विद्यालय (कोरेगाव), रघुनाथमल ओसवाल विद्यालय (जांब, त्रिपुटी), परांजपे हायस्कूल व वसंतदादा पाटील विद्यालय (रहिमतपूर) या संघांचा समावेश होता. यापैकी सरस्वती विद्यालय (कोरेगाव) व काळंगे गुरुजी विद्यालय (मोळ, मांजरवाडी) या संघांनी उपविभागाच्या स्तरावर अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावले. सरस्वती विद्यालयातील साक्षी फडतरे, उत्कर्षा जगदाळे, वर्षा कदम आणि काळंगे गुरुजी विद्यालयातील दिव्या गायकवाड, प्रतीक्षा भोसले, प्रतीक्षा नांगरे यांची भाषणे प्रभावी ठरली. विजयी संघांना अनुक्रमे सौ. बडीगार व अमर यादव यांनी मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून पांडुरंग पवार, श्री. ढाणे, श्री. शेडगे यांनी काम पाहिले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विजेत्या दोन्ही संघांना उपस्थित मान्यवरांनी जिल्हास्तरावरील वक्तृत्व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र यादव यांनी प्रास्ताविक व संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले.



**कोरेगाव : वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या संघांसमवेत प्रेरणा कट्टे, राजाभाऊ जगदाळे, राजेंद्र यादव, डॉ. विजयसिंह सावंत आदी.** (शेखर रसाळ : सकाळ छायाचित्रसेवा)